महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

New Horizon, Renewed Confidence...

Government of Maharashtra

## Rural Development Department

## MAHARASHTRA STATE RURAL LIVELIHOODS MISSION

# FAQs

# State Level Training of Trainers (ToT)

**Venue: Hotel K Stars, CBD, Belapur, Navi Mumbai**

**थकबाकीदार महिला; स्वयंसहाय्यता समूहाची सदस्य होवू शकते काय ? आणि अशा स्वयंसहाय्यता समूहास कर्ज मिळू शकेल काय?**

- जर स्वयंसहाय्यता समुहाच्या सदस्याच्या कुटुंबातील व्यक्ती अथवा नातेवाईक थकबाकीदार असेल तर तो सदस्य थकबाकीदार समजला जाणार नाही.
- जर स्वयंसहाय्यता समुह सदस्याच्या कुटुंबातील व्यक्ती अथवा नातेवाईक थकबाकीदार असेल तरी स्वयंसहाय्यता समुहाला बॅंक कर्ज देवू शकते.
- एखादया स्वयंसहाय्यता समुहातील काही सदस्य वैयक्तिकरित्या थकबाकीदार असतील तरीही अशा स्वयंसहाय्यता समुहाला बॅंक कर्ज देवू शकेल.(Ref : RBI Master Circular २७ June २०१३)

**अज्ञान व्यक्ती स्वयंसहाय्यता समुहाचा सदस्य होवू शकतो का ?**

- नाही, स्वयंसहाय्यता समुहाचा सदस्य होण्यासाठी किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे.

**स्वयंसहाय्यता समूह ज्या बॅंक शाखेच्या सेवाक्षेत्रात असेल त्या व्यतिरिक्त इतर बॅंक शाखेमध्ये खाते उघडू शकतो काय ?**

- होय. (RBI Master Circular १४ Feb २०११)

**मुदत कर्ज (Term Loan) (TL) म्हणजे काय? आणि पतमर्यादा (Cash Credit Limit) (CCL)**

- मुदत कर्ज - मुदत कर्ज म्हणजे बॅंकेची निश्चित निर्धारीता कालमर्यादा व बदलता व्याज दर असलेले कर्ज होय ?
- पतमर्यादा - पत मर्यादा म्हणजे कर्ज अथवा ओव्हर ड्राफट सुविधा होय.
- ही पतमर्यादा ३ ते ५ वर्षासाठी दिली जाते व ती स्वयंसहाय्यता समुहाच्या बचत / जमापुंजी (corpus) च्या आधारे निर्धारीत केले जाते. या निर्धारीत पतमर्यादेत दरवर्षी उचल रक्कम (Drawing Limit) निश्चित केली जाते.
- **उदाहरणार्थ :-** पतमर्यादा निर्धारीत करणे.

(नाबार्ड SHG २ Circular २७ March २०१२ RBI Master Circular २७ June २०१३)

**स्वयसहाय्यता समुहास केवळ फक्त पतमर्यादा किंवा मुदत कर्ज देता येते काय ?**

- स्वयंसहाय्यता समुह त्यांच्या आवश्यकतेनुसार पतमर्यादा सुविधा किंवा मुदत कर्ज अथवा दोन्ही देखील घेवू शकेल.
- बॅंक कर्जासाठी RBI Master Circular २७ June २०१३

**गटाचे वय ६ महिने पूर्ण कोणत्या तारखेपासून मोजले पाहिजे ?**

- ज्या दिवशी तारखेस स्वयंसहाय्यता समुहाची पहिली बैठक होवून स्वयंसहाय्यता समुह स्थापनेचा ठराव घेण्यात आला असेल (इतिवृत्त पुस्तकानुसार) ती तारीख गट स्थापनेची धरुन गटाचे वय मोजले पाहिजे. (Ref : RBI Master Circular २७ June २०१३)

**बॅक कर्जासाठी स्वयंसहाय्यता समुहास कोणती कागदपत्रे देणे आवश्यक आहे ?**

- स्वयंसहाय्यता समूहाचा बॅक कर्जासाठीचा ठराव
- कर्ज मागणी अर्ज
- गटातील सदस्यांचा परस्पर सहमती करार
- बॅकेसोबत कर्जासाठी केलेले करारपत्र (Ref : Handbook on forming SHG by NABARD)

**स्वयंसहाय्यता समुहाचे पदाधिकारी यांनी बॅक खाते उघडतांना हाताचा अंगठा सही निशाणी म्हणून दिली असेल आणि काही कालावधी नंतर त्यांना स्वाक्षरीचा वापर करावयाचा असेल तर असे करता येईल काय?**

- होय, बॅक त्यांची नमुना स्वाक्षरी घेवून पुढील सर्व बॅक व्यवहारासाठी पदाधिका-यांना स्वाक्षरीचा उपयोग करण्याची मूभा देईल.

**स्वयंसहाय्यता समूहाचे पदाधिकारी बदलल्यास काय केले पाहिजे ?**

- स्वयंसहाय्यता समुहाचे पदाधिकारी बदलल्याचा ठराव बॅकेमध्ये दिला पाहिजे. बॅक त्यांची नोंद घेवून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या नमुना स्वाक्षरी घेईल. त्यानंतर नवीन नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना त्यांच्या स्वाक्षरीने स्वयंसहाय्यता समुहाचे बॅकेमधील व्यवहार करता येतील.

**बॅकेकडून कर्ज मिळविण्यासाठी स्वयंसहाय्यता समुहास आपली बचत बॅकेत ठेवणे आवश्यक आहे का ?**

- नाही! कर्ज देण्यासाठी समुहाची बचत बॅकेत ठेवण्याचे बंधन बॅक घालू शकत नाही किंवा समुहाची बचत कर्जासाठी तारण ठेवू शकत नाही.

**बॅंकेकडून कर्ज मिळविण्यासाठी स्वयंसहाय्यता समूहास बॅंकेद्वारे सदस्यांचा विमा उतरविणे बंधनकारक आहे काय?**

- नाही, समूहातील सदस्य त्यांच्या गरजा व जोखिमेनुसार विमा उतरवू शकतात.

**स्वयंसहाय्यता समूहांसाठी कर्ज देतांना बॅंक प्रक्रीया शुल्क व मुद्रांक शुल्क यांची आकारणी करु शकते काय ?**

- नाही, महिला स्वयंसहाय्यता समुहाला दिलेले कर्ज हे वंचित घटकांना दिलेले अर्थसाह्य असल्याने कोणतेही प्रक्रीया शुल्क अथवा सेवा शुल्क आकारता येणार नाही
- तसेच राज्य शासनाने अशा कर्जावरील मुद्रांक शुल्क देखील माफ केलेले आहे.
- (Ref : RBI Circular Priority Sector १ July २०१३)

**स्वयंसहाय्यता समुहास थकीत कर्जावर बॅंक दंड व्याज आकारणी करेल काय ?**

- नाही , रु. २५०००/- प्रतीसदस्य पर्यतच्या कर्जावर कोणतेही दंड व्याज बॅंकेस आकारता येत नाही.
- RBI Master Circular ०१ July २०१३

**बॅंक कर्जासाठी स्वयंसहाय्यता समुहाने प्रकल्प अहवाल देणे आवश्यक आहे काय ?**

- स्वयंसहाय्यता समूहास दयावयाच्या पहिल्या दोन कर्जासाठी (Dose) प्रकल्प अहवालाची आवश्यकता नाही. सदर दोनही कर्ज ही समुहातील सदस्यांच्या कौटुंबिक गरजा (Consumption Loan) भागविण्यासाठी असतील.

**स्वयंसहाय्यता समुहाने फक्त उत्पादक कारणांसाठीच बॅंकेकडून कर्ज घेणे बंधनकारक आहे काय ?**

- स्वयंसहाय्यता समुह सदस्यांच्या कौटुंबिक गरजा सामाजिक गरजा भागविण्यासाठी, जास्त व्याजदराने घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी, वैयक्तिक उत्पन्नांच्या स्त्रोतांचे बळकटीकरण करण्यासाठी अथवा सामुहिकरीत्या उत्पादक उपक्रम सुरु करण्यासाठी बॅंकेकडून कर्ज घेवू शकतात.

**स्वयंसहाय्यता समुहाच्या जमापुंजीमध्ये (Corpus)कोणत्या गोष्टीचा समावेश होतो ?**

- सदस्य बचत, दंड, ठेवीवरील व बचतीवरील व्याज, अंतर्गत कर्जावरील व्याज, शासकीय मदत, फिरता निधी, देणगी व इतर सर्व उत्पन्न व जमा, आणि पुढील १२ महिन्यात जमा होणारी बचत व अंतर्गत कर्जावरील अपेक्षित बचतीची रक्कम यांचा देखील समावेश असावा. RBI Master Circular २७ June २०१३

**स्वयंसहाय्यता समुहास कर्ज मिळविण्यासाठी तारणाची आवश्यकता आहे का ?**

- स्वयंसहाय्यता समुहास १० लाखापर्यंतच्या कर्ज रक्कमेसाठी तारणाची आवश्यकता नाही.
- (RBI Master Circular २७ June २०१३)

**स्वयंसहाय्यता समुहाच्या बचत खात्यातून परस्पर कर्ज वसुली करता येईल काय ?**

- स्वयंसहाय्यता समुहाचे बचत खाते व पतमर्यादा / कर्जखाते स्वतंत्र आहे. स्वयंसहाय्यता समुहाच्या परवानगी शिवाय बचत खात्यातून कर्ज वसुली करण्यात येणार नाही. मात्र खाते NPA झाले तर वसुलीचा बँकेला अधिकार आहे.

**बॅकेने कर्ज - पुस्तिका (Loan pass book) दिली पाहिजे का ?**

- होय! स्वयंसहाय्यता समुह बँकेकडे कर्ज पुस्तिकेसाठी आग्रह करु शकतील. तसेच पर्यायी व्यवस्था म्हणून कर्ज पत्रक (Loan Statement) मिळू शकते

**स्वयंसहाय्यता समुहाचे बॅकेत खाते उघडण्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्रे कोणती ?**

- समुहाचा बॅकेत खाते उघडण्यासाठीचा ठराव
- समुहाच्या वतीने बॅकेतील खाते चालविण्याचा अधिकार कोणास दिला आहे. उदा. अध्यक्ष, सचिव इ. त्याबाबतचा ठराव
- बॅकेतील खाते चालविणाऱ्या व्यक्तीचे ओळखपत्र व निवासाचा दाखला व फोटो आणि स्वाक्षरीचा नमुना

**बॅक खाते उघडण्यासाठी बचत गटाच्या सर्व सदस्यांची ओळखपत्र व रहिवाशी दाखल्याची आवश्यकता आहे काय ?**

- नाही, फक्त बँकेतील खात्याचे व्यवहार करणाऱ्या संबंधित व्यक्तींच्याच कागदपत्रांची आवश्यकता आहे.

**स्वयंसहाय्यता समुह शुन्य रु. शिल्लकीचे "नो फ्रिल" खाते उघडू शकतात का?**

- अत्यंत गरीब महिला सदस्यांचे स्वयंसहाय्यता समूह; शुन्य रुपये बचतीचे "नो फ्रिल" खाते उघडू शकतात असे खाते खेळते भांडवल किंवा कर्ज मंजूरी नंतर जास्त पैशांचा व्यवहार सुरळीत व्हावा म्हणून नियमित बचत खात्यात रुपांतरीत करु शकतात.

**समुहाच्या बँकेतील खात्यात जास्त रक्कम शिल्लक राहीली पाहिजे का?**

- समुहाने जमा होणारी बचत जास्तीत जास्त अंतर्गत कर्जासाठी वापरावी, सदस्यांना गरजेच्या वेळी मदत व्हावी. अंतर्गत कर्जाच्या व्याजातून गट सक्षम होत रहावा अशी अपेक्षा आहे. बँकेत बचत खाते उघडताना चेकबुक तसेच ATM सारख्या सेवा हव्या असतील तर प्रत्येक बँकेच्या नियमाप्रमाणे विशिष्ट रक्कम कमीत कमी ठेवावी लागते. अन्यथा दंडची रक्कम खात्यावर पडते. असे होऊ नये म्हणून या सुविधा नकोत असे सांगून समुहाचे खाते उघडावे लागेल.

**महिलांच्या स्वयंसहाय्यता समुहांना स्टँप ड्युटी माफ आहे काय?**

- होय, मुंबई स्टॅप ड्युटी अधिनियम १९५८ मुद्रांक ९००३, दिनांक १७ नोव्हेंबर, २०११ च्या शासकीय परिपत्रक निर्देशानुसार सर्व महिला स्वयंसहाय्यता समुहांना स्टँप ड्युटी माफ आहे. त्यामुळे कर्ज प्रस्तावाच्या वेळी करारनामा "स्टँप पेपरवर " घेण्याची आवश्यकता नाही.

**पंतप्रधान जन-धन योजनेंतर्गत पुन्हा खाते उघडण्याची गरज आहे काय?**

- बँकेत अगोदरच खाते असेल पण रुपे डेबीट कार्ड नसेल तर पुनहा खाते उघडण्याची गरज नाही. अगोदरच असलेल्या खात्यावर रुपे डेबीट कार्ड मिळू शकते.